# प्रकरण चौथे

# प्रकरण चौथे

# रवींद्र शोभणेंच्या कथेतील भाषा आणि निवेदन

## प्रस्तावना

तिसऱ्या प्रकरणात शोभणेंच्या 'वर्तमान' आणि 'शहामृग' या कथेतील पात्रांचे परस्परसंबंध याचा विचार केला. या प्रकरणात 'वर्तमान' आणि 'शहामृग ' या कथासंग्रहातील कथेतील भाषा आणि निवेदन या अनुषंगाने अभ्यास करायचे ठरविले आहे.

कथेतील भाषा हा कथेचा महत्त्वाचा घटक आहे. कथेची भाषा कविता या वाङ्.मय प्रकारा पेक्षा वेगळी असते. कथेतील भाषा व्यवहाराच्या भाषेशी मिळतीजुळती असते. भाषेत संवादाचा वापर केलेला असतो. लेखकाला जे काही सांगायचे आहे ते तो भाषेच्या माध्यमातून मांडत असतो. लेखकाचा हेतू, दृष्टिकोण त्याचे आशयाचे आकलन यांच्याशी जुळणारी अशीच त्याची भाषा असते. कथेतील भाषा, पात्राचे वय, शिक्षण, संस्कृती, प्रदेश याला अनुसरून असावी. म्हणून लेखक जाणीवपूर्वक भाषेची योजना करत असतो. त्यामुळे लेखकाला अभिप्रेत असणारा आशय त्यातून व्यक्त होत असतो. म्हणून भाषा हे आशयाचे अंगच असते.

प्रत्येक व्यक्ती जी भाषा बोलते त्यावरून त्याचे सनाज व्यवस्थेतील स्थान प्रदेश वैशिष्ट्ये, बोलणाऱ्या व्यक्तीशी त्याचा असणारा संवंध व त्याचे वय, स्त्री – पुरूष स्वभाववैशिष्ट्ये कळून येत असतात. व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व त्याच्या भाषेतून व्यक्त होत असते. म्हणून लेखकाला त्याच्या तोंडचे संवाद, लकबी एवढेच सांगायचे नसते. तर संवादातून पात्राचे मनोगत, आचार, विचार, विकार, भावना, संस्कृती या सर्व गोष्टीचे दर्शन घडवायचे असते. ती व्यक्ती जिवंत करायची असते. म्हणूनच कथेमध्ये संवादाच्या भाषेला महत्त्वाचे स्थान आहे.

संवादाची भाषा जशी महत्त्वाची तशीच निवेदनाची भाषा ही महत्त्वाची असते. वाचकाला परिचय करून देणे, कथानक पुढे सरकवणे, मार्मिकपणे भाष्य करणे, साध्या सरळ भाषेतून आपले मत

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

व्यक्त करणे हे निवेदनातून साधले जाते. म्हणून संवादाच्या भाषेप्रमाणेच निवेदनाची भाषा ही महत्त्वाची असते.

संवादाची भाषा व निवेदनाची भाषा यांचे महत्त्व पाहिल्यानंतर शोभणेंच्या कथेतील संवादाची भाषा व निवेदनाची भाषा कशी आहे हे पहावयाचे आहे.

शोभणेंनी आशयानुसार भाषेचा वापर केलेला दिसतो. प्रामुख्याने प्रमाण भाषेचा वापर त्यांनी केलेला आहे. शोभणे हे विदर्भातील लेखक आहेत. तरी त्यांनी वऱ्हाडी भाषेचा कुठेच वापर केलेला दिसून येत नाही. निवेदनासाठी त्यांनी प्रमाण भाषेचा वापर केला आहे. तर संवादाची भाषा पात्रानुरूप बदललेली दिसते. नागर जीवनाचे चित्रण करण्यासाठी प्रमाण भाषेचा वापर केलेला दिसतो व ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना संवादासाठी बोली भाषेचा वापर केलेला दिसतो. आज मराठी भाषेमध्ये इंग्रजी शब्दांचा, वाक्यांचा वापर हा काळानुरूप आलेला बदल आहे. त्यामुळेच असेल शोभणेंनी भाषेमध्ये इंग्रजी–हिंदी शब्दांचा, वाकयांचा अधिक वापर केलेला दिसून येतो. पण शोभणेंनी कुठेही अलंकारांचा वापर केलेला नाही व भाषेमध्ये मोडतोड करण्याचाही मोह त्यांनी टाळलेला दिसतो. तसेच प्रतिक व प्रतिमांचाही वापर फारसा केलेला नाही. त्यांनी वापरलेली भाषा सहज, सुलभ अशीच वाटते.

शोभणेंनी कथेत पात्रानुरूप भाषेचा वापर केलो दिसतो. प्रत्येक पात्रानुसार संवादाची भाषा बदललेली दिसून येते. पात्र कसे बोलते ? त्यावरून त्या व्यक्तीचे मनोगत, आचार, विचार, विकार, भावना, संस्कृती, विकृती या सर्व गोष्टीचे दर्शन घडते. शोभणेंनी रंगवलेली पात्रे विविध क्षेत्रातील दिसून येतात. राजकीय, व्यवसायीक, शैक्षणिक अशा वेगवेगळया क्षेत्रानुसार भाषा आलेली दिसते, वेगवेगळ्या क्षेत्रानुसार आलेली पात्रे आपापल्या स्वभावगुणधर्मानुसार बोलताना दिसून येतात.

'वर्तमान' या कथासंग्रहातील 'पायरीचा दगड' या कथेतून सुधीर आणि बाळासाहेब यांच्या संवादातून राजकीय क्षेत्रात मुरलेली व्यक्ती कशी बोलते ते समजते.

'तुला नोकरी करणे आवडेल का ?'

'का नाही ? त्याकरिताच तर सतत धडपड सुरू आहे.'

'नाही, म्हटलं, समाजकार्यात उतरला आहेस, तेव्हा नोकरी वगैरे करतो की नाही ...'

'समाजकार्य हा आवडीचा विषय आहे. पण समाजकार्यातून पोट भरत नाही, अर्थात पोट भरल्यावर समाजकार्य सोडून देईन, असं मात्र नाही.'

'आता मुद्यावर आलास तू. समाजकल्याण मंत्र्यांनी मला प्रॉमिस दिले आहे. ते तुला पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्ये चांगल्या जागेवर चिपकवणार आहेत.'

'हे तर माझ्याकरिता खूप झालं, बाळासाहेब...' सुधीर भारावल्यागत झाला होता.

'पण त्यांची एकच अट आहे. राजकीय पुढाऱ्यांना अडचणीत आणणाऱ्या मागण्या करू नका. नको तिथं आंदोलनं छेडू नका.'

'म्हणजे ?'

'थोडक्यात, समाजकार्य बंद करा. चार–चौघांसारखं सुखात आणि आरामात जीवन घालवा.'

....

'बाळासाहेब, माझ्या समाजानं माझ्यावर विश्वास टाकला. मी त्यांना फार मोठं काही देऊ शकेन, असा त्यांना माझ्याबद्दल विश्वास आहे. ते मला आमच्या समाजाचा भावी आंबेडकर, भावी पंजाबराव देशमुख समजतात.'

'सब झूट हैं !' नाळ तोडून टाकल्यागत ते म्हणाले, 'आंबेडकर, भाऊसाहेब यांनी त्यांच्या समाजाला जे दिलं, ते तू तूझ्या समाजाला देऊ शकशील असं वाटतं तुला ? त्यांच्या हातात सत्ता होती. तुझ्या हातात काय आहे ? आधी तू स्वत: मोठा हो. मग समाजाचा विचार कर.'

'पण माझ्या या समाजानं मला आज थोडं–फार नाव दिलं. माझा समाज सावलीसारखा माझ्या पाठीशी उभा आहे.'

'मग तेवढ्यापुरतं समाजकार्य कर. सामूहिक विवाह, परिचय–मेळावे वगैरे ठीक आहे. तू जर तुझ्या समाजासाठी नोकरी–भरतीत आरक्षण मागू लागलास, तर मग इतर समाजही पुढं येतील. कुणबी आहे, सुतार आहे, सोनार आहे, वाणी आहे. त्यांनाही मग आरक्षण द्यावं लागेल, की नाही ? त्यामुळं सरकार अडचणीत येईल. हा विचार कर.'

'पण मी माझ्या समाजाचा विश्वासघात केल्यासारखं होईल.'

'समजा, तुझ्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत, तर ? आणि त्या नक्कीच पूर्ण होणार नाहीत. हे इतकं सोपं नाही. पिढ्यान् पिढ्या संघर्ष करावा लागेल, तेव्हा कुंठ थोडी–फार जमीन भुसभुशीत होईल. शिवाय ही शक्कल तुझीच आहे.'

'मला माझ्या तत्त्वांचा पराभव पहावा लागेल. मला सगळे हसतील. माझं तोंड दाखवायलाही मला जागा राहणार नाही.'

'व्यवहारात प्रत्येक वेळी आपल्या तत्त्वांचा विजय होतोच, असं नाही आणि तत्त्वांचा विजय झाला असता तर रामराज्य आलं असतं. आज तत्त्वांपेक्षा व्यवहाराचा विजय होतो. नेहमीच व्यवहार शीक. अरे शेवटी आपला समाजच आपल्याला मोठं करतो. कोणताही माणूस हा त्या समाजाला मोठं करीत नाही. लक्षात घे.'('वर्तमान' पृ.१४)

यातून असे दिसून येते की भ्रष्ट व्यवहार करणारे पुढारी निर्ढावलेले, हेकेखोर व मुत्सदी असतात. ते स्वत:चे काम करून घेण्यासाठी वेळप्रसंगी मवाळ भाषेचाही वापर करतात. लेखकाने हे लक्षात घेवून बाळासाहेबांच्या तोंडी तशी भाषा दिलेली दिसते. बाळासाहेबांची सुरवातीची मवाळ असलेली भाषा नंतर कठोर झालेली दिसते. सुरवातीला 'तुला नोकरी करणे आवडेल का ? असे विचारणारे बाळासाहेब नंतर मात्र सुधीरला नोकरी देताना म्हणतात की, 'पण त्यांची एकच अट आहे. राजकीय पुढाऱ्यांना अडचणीत आणणाऱ्या मागण्या करू नका.' अशा बोलण्याच्या भाषेतून बाळासाहेबांचा मुत्सदीपणा, चलाखपणा दिसून येतो. तर सुधीर बाळासाहेबांसामोर दबून गेला आहे. त्याच्यावर दडपण आले आहे असे त्याच्या बोलण्यातून जाणवते.

'वर्तमान' या कथासंग्रहातील 'हकनाक' या कथेतून संपादक व वार्ताहर कसे बोलतात ते पुढील संवादातून दिसून येते.

'हं ... हो. ही बातमी काल कुणी टाकली ?'

'अच्छा, अच्छा ... ही का ? ही ती आपल्या देशपांडेनं टाकली.'

'आला का तो ?'

'नाही. आज सुटीवर आहे तो. उद्या ऑफ आहे.'

'ते गृहस्थ हेच आहेत.' माझा निर्देश करीत संपादक म्हणाले, 'त्यांचं म्हणणं ऐकून घ्या.'

'अच्छा .. म्हणजे तुम्हीच प्रा. आनंद झाडगावकर, तर ! कुठल्या विषयाचे प्राध्यापक आहात तुम्ही ?'

'संस्कृतचा.'

'अच्छा, अच्छा ... ! म्हणूनच संस्कृत म्हटलं, की सोमरस आलाच.' ('वर्तमान' पृ.६०)

या संवादप्रसंगात संपादक व वार्ताहर यांच्या व्यवसायाला अनुरूप ठरेल अशा भाषेचा वापर येथे लेखकाने केलेला दिसतो. संपादक हा वार्ताहरापेक्षा हुद्याने मोठा आहे तरीसुध्दा वार्ताहर संपादकांना 'रामभाऊ' या नावाने बोलावतो. त्यावरून संपादकापेक्षा वार्ताहर वयाने मोठा आहे हे जाणवते. तसेच त्यांच्या स्तरामधील फरकही बोलण्यातून जाणवतो. त्याच बरोबर इतरांबद्दल बोलताना वार्ताहराची जी तुच्छतेची भाषा असते. याचा नेमका अविष्कार येथे लेखकाने केलेला दिसतो. 'बातमी छापणे' ऐवजी 'बातमी टाकणे' हा व्यवसायिक क्षेत्रातील शबद वापरून लेखकाने नेमकेपणाने वापरलेला दिसतो. व 'अच्छा अच्छा' अशी वार्ताहरची बोलण्याची लकब याकडेही लेखकाने लक्ष दिलेले दिसून येते.

'वर्तमान' या कथा संग्रहातील 'जल्लोश' या कथेतील प्रा. काशीकर व विद्यार्थी प्रळू यांच्या संवादातून प्राध्यापकाची भाषा कशी असते ते समजते.

'मि. मोवाडकर तुम्ही चुकीच्या वाटेनं जाताहात. तुमच्याकडून आम्हांला तरी असली अपेक्षा नव्हती. तुम्ही एक स्कॉलर विद्यार्थी आहात. तुम्हाला निवडणूकच लढवायची होती, तर शांतपणे लढवायची. हेसंप वगैरे कशा करिता ?'

'या निवडणुकीत प्राचार्यांनी भ्रष्टाचार केला, सर म्हणून नाइलाजानं मला हे पाऊन उचलावं लागलं ?'

'प्राचार्यांनी भ्रष्टाचार केला, हे विधान तुम्ही कोणत्या आधारावर करताहात ?'

'समता पॅनेलवाल्यांजवळ कोरे बॅलट पेपर्स दिसतात आणि प्राचार्य त्यांना कुठलीही शिक्षा न करता मोकळं सोडून देतात, याचा अर्थ काय ? याचा अर्थ एकच, समता पॅनेलवाल्यांना प्राचार्य बॅकिंग देतात.'

'पण म्हणून तुम्ही संप पुकारून कॉलेजची शिस्त बिघडवताहात ? एकदाचे निवडणुकीचे निकाल तरी लागू द्या ...'

'निकाल स्पष्टच आहे...'

'तुम्ही निवडून येणार, असाच ना ?'

'नाही, समता पॅनेल निवडणूक जिंकणार. कारण त्यांनी खोट्या मतपत्रिका मतपेट्यांमध्ये घुसवल्या असतील आपल्या प्राचार्यांना गॅदरिंगमध्ये तमाशे करणारा पैशाची अफरातफर करणारा अध्यक्ष हवा आहे. आमच्या सारख्या विद्यार्थ्यांकडून ते फक्त आपल्या कॉलेजचं नाव गाजवून घेणार पण ते किंवा कॉलेज आम्हाला काय देणार आहेत ?'

'तूर्तास हे विचार बाजूला ठेवा आणि संप मागे घ्या.'

'माझ्या मागण्या पूर्ण व्हाव्यात...'

'त्या मागण्या प्राचार्यांना मंजूर नाहीत.'

'तुमचा संप कितीही दिवस चालला, तरीही त्याचा कॉलेजवर काहीही परिणाम होणार नाही. उलट, तुम्हीच बदनाम व्हाल.' ('वर्तमान' पृ.१२७)

लेखकाने वरील संवादातून काशीकरांसाठी प्राध्यापकाला साजेशी भाषा वापरलेली दिसून येते. काशीकरांच्या भाषेतून प्राध्यापकांच्या भाषेतील मार्दवता जाणवते. विद्यार्थ्याला समजावताना बोलण्यात ठेवलाला संयम जाणवतो. लेखकाने प्रा. काशीकरांच्या भाषेतून तोलून मापून शब्दांचा केलेला वापर जाणवतो. मोजक्या शब्दात मोठा उपदेश करणारी प्राध्यापकांची भाषा लेखकाने इथे जाणिवपूर्वक वापरल्याचा भास होतो. तर प्रभूच्या बोलण्यातून जिद्दी स्वभावाचे दर्शन घडते व त्याची भाषा आक्रमक अशीच वाटते. प्रभूला आलेला राग, चीड त्याच्या भाषेतून चित्रित होते.

'वर्तमान' या कथासंग्रहातील 'तेथ लव्हाळे राहती' या कथेतून सुदामदादा सारखे स्वातंत्र्यसैनिक गांधीवादावर कशा प्रकारे चिडून बोलतात ते पुढील संवादातून समजते.

'सुदामदादा कट्टर गांधीवादी आहेत.'

'म्हणूनच सुदामदादा राजकारणात टिकले नाहीत. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणं वेगळं आणि एवढ्या मोठ्या देशाची धुरा सांभाळणं वेगळं.' मध्येच दुसरा बोलला.

'सुदामदादांना राहवलं नाही. त्यांनी एक टोला हाणलाच.'

'आम्ही ब्रिटिशांचे दंडुके खाऊन तुम्हांला स्वातंत्र्य मिळवून दिलं आणि तुम्ही मात्र मजा मारताय. गांधीजींनी आयुष्यभर पायपीट केली, घरादारावर तुळशीपत्र ठेवलं, ब्रम्हचर्य पाळलं आयुष्यभर. तुम्ही काय केलं यापैकी ? सरकारी गाड्या उडवता, मजा मारता ... घरात बायको असताना बाहेर पुन्हा दोन बायका ठेवता ? अरे, आमचा गांधीवाद कालबाह्य झाला असला, तरी गांधीजींनी आम्हा नीतिमत्ता शिकवली, निस्पृहता शिकवली. तुम्ही काय शिकलात यापैकी ?'

पाठीत अचानक गुद्दा मारावा, असा तो सुदामदादांचा सवाल सगळयांना लागला ...

'पण, दादा, केवळ गांधीजी म्हणजे भारत नव्हे ... '

'कबूल हो ! पण गांधीजी भारताच्या इतिहासाला एक प्रखर दीपस्तंभ आहे. त्यांनी सूरू केलेली खादी कशाला अंगावर घालता मग ? केवळ पक्षाचं तिकीट मिळावं, म्हणून ? अहो, स्वतःचं आत्मपरीक्षण करा ? तुम्ही गांधीजींच्या नखाची तरी बरोबरी करता का ? तुमची मूल्यात्मकता किती डागळली आहे, याचा विचार करा.' ('वर्तमान' पृ.१३६,१३७)

वरिल संवादातून असे दिसून येते की, लेखकाने सुदामदादा हे एक स्वातंत्र्यसैनिक आहेत. हे ध्यानात घेवून भाषेचा वापर केलेला आहे. उदा. दंडुके, ब्रम्हचर्य सारख्या शब्दांचा जाणिवपूर्वक वापर केलेला आहे.तसेच लेखकाने सुदामदादाची गांधीजींच्या तत्वावरील निष्ठा चित्रित व्हावी यासाठी प्रश्नार्थक वाक्यांचा वापर केलेला दिसतो. उदा. त्यांनी सुरू केलेली खादी कशाला अंगावर घालता मग ? केवळ पक्षाच तिकीट मिळावं म्हणून ? अशा अनेक वाक्यांतून सुदामदादांना आलेला राग व्यक्त होतो. लेखकाने वरील संवादातून शब्दांचा जपून वापर केलेला दिसतो. तरी त्या शब्दातील प्रखरता कमी होत नाही. उदा. गाड्या उडवता. मजा मारता अशा शब्दांचा वापर केलेला दिसतो.

'शहामृग' या कथासंग्रहातील 'शहामृग' या कथेतून वेश्या कशी बोलते ? ते पुढील संवादातून समजते.

'तू तिथून इथं या वस्तीत कशी आली ?'

'थे मावशी पैशाले मोठी चिकट होती. अंडा मुर्गी देत होती आनं मावसी मजा करत होती. एक पोरगी आणखी अशीच होती. मी म्हनलं, हे आपल्याले नाही पुरवत' वेगळी झाली. आता राहनं

मंगळवारीत आनं धंदा इथं. इथं पन्नास रूपे रोजाचा कमरा आहे. कसाही दिवस निघाला तरी शंभर दीडशेच्या खाली नाही उतरत. एकट्या जिवाले असं आनखी कितीक लागते ?'

– आणि आता ती त्यांच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेन पाहू लागी.

'तुला इथं या वस्तीत, या नरकातच रायचं आहे?' कमलाताईनी तिला विचारलं.

'आता तुमाले तरी असं राहनं आवडंन का बाई ? कोनाले वाटत नाही आपला सौंसार पाह्यजे, पोरं पाह्यजे ... पण थे नसिबातच नसंन तं काय देव असा वरतून आपल्या पदरात टाकाचा राहयल ?' ('शहामृग' पृ.५१,५२)

या संवादातून लेखकाने वेश्येसाठी ग्रामीण बोली भाषेचा वापर केला आहे. तर कमलताईंसाठी प्रामण भाषेचा वापर केलेला दिसतो. वेश्येच्या बिनधास्त बोलण्याची लकब, भाषेतून जाणवते. उदा. 'आता राहनं मंगळवारीत आनं धंदा इंथ'. त्याच बरोबर लेखकाने वेश्येचा अडाणीअसूनही व्यवहारातील चोखपणा बोलण्यातून चित्रीत केला आहे. उदा.'इथं पन्नास रूपे रोजाचा कमरा आहे. कसाही दिवस निघाला तरी शंभर दीडशेच्या खाली नाही उतरत.' अशा प्रकारे लेखकाने वेश्येची भाषा वापरताना वरील सर्व गोष्टींकडे लक्ष दिलेले दिसून येते.

'शहामृग' मधील 'केसाळ कातडीचे श्वापद' या कथेत आलेल्या वेणू व जोगी यांच्या संवादातून वेणूच्या दमनातून निर्माण झालेल्या विकृतीचे व जोगीच्या योग साधनेचे व पावित्र्याचे असे दोन व्यक्तीच्या बोलण्यातील फरक त्यांच्या भाषेतून जाणवतो.

'हा मृदंग तू किती वर्षांपासून वाजवतोस रे ?'

'वीस वर्षापासून. दहा वर्षाचा होतो तेव्हा गुरूमाऊलींन हा मृदंग माझ्या गळ्यात टाकला. आता मृत्यूपर्यंत त्याचीच सोबत.'

'लग्न नाही केलंस ?'

'आमच्या पंथात मोहजाळात, संसारात अडकणं पाप आहे. परमेश्वराच्या सेवेत उभा जन्म घालवायचा आणि ही कुडी. त्यागून आत्म्याला परमेश्वराच्या अस्तित्वात विलीन करून घ्यायचं. आत्म्याचं परमात्म्याशी मीलन करून अद्वैत साधायचं.'

कुणास ठाऊक का तर, पण त्यांचं बोलणं तिला अर्थहीन वाटत होतं. अवडंबर वाटत होतं.

'तू लग्न केलं नाहीस तेव्हा तुझ्या शरीरात असं एखादं केसाळ कातडीचं श्वापद नाही ? ते कधी उसळी मारून वर येत नाही ? ते तुला बोचकारत नाही, ओरबाडत नाही ?' तिन त्याला विचारलं.

'आई, प्रत्येक माणसामध्ये असं एक श्वापद असतं. तुम्ही म्हणता तसंच. ते श्वापद षड्रिपूंपासून तयार झालेल असतं. आपण आपल्यातल्या षड्रिपूंचा पराभव केला. नायनाट केला की ते श्वापदही मग आपोआप मरून पडतं आणि षड्रिपूंचा पराभव करायचा म्हणजे परमेश्वराला शरण जाणे ...' (शहामृग पृ.१०४, १०५)

वरील संवादातून लेखकाने वेणूच्या विकृत स्वभावाचे चित्रण करणारी भाषा वापरलेली आहे. वेणू विकृत असल्यामुळे ती कशा प्रकारे बोलेल, कोणते प्रश्न विचारेल. याकडे लेखकाने लक्ष केंद्रित केले आहे. उदा. जोगीला वेणू प्रश्न करते 'तू लग्न केल नाहीस तेव्हा तुझ्या शरीरात असं एखादं केसाळ कातडीचं श्वापद नाही ?' याच प्रमाणे लेखकाने जोगीचे पावित्र्य त्याच्या बोलण्यातून चित्रित केले आहे. जोगी बोलताना वेणूला'आई' म्हणून संबोधतो. लेखकाने 'आई' हा शब्द जोगीच्या मनातील निष्पाप वृत्ती चित्रित करण्यासाठी घेतलेला दिसतो. तसेच आत्म्याचे परमात्म्याशी मीलन, षड्रिपूंचा पराभव करणे अशा बोलण्यातून जोगीच्या योग साधनेचे दर्शन घडते. अशा प्रकारे एकाच वेळी दोन विरूद्ध मनोवृत्ती असलेल्या व्यक्तींच्या भाषेतील फरक दिसून येतो.

अशा प्रकारे वरिल सर्व पात्रांच्या बोलण्यातून प्रत्येक पात्राचे वेगळेपण जाणवते. शोभणेंनी पुढारी, स्वातंत्र्यसैनिक, प्राध्यापक, वार्ताहर, वेश्या, विकृतवृत्तीची महिला, जोगी. अशी पात्रे रंगवलेली आहेत. ही सर्व पात्रे आपापल्या आचार, विचार, संस्कृती, वय, विकार, भावना, विकृती नुसार बोलताना दिसतात. बाळासाहेब हे पुढारी निढावलेले, मुत्सदी असले तरी वेळप्रसंग बघून मवाळ भाषेचा वापर करताना दिसतात. संपादक वार्ताहरापेक्षा स्तराने मोठा आहे. पण वयाने लहान आहे. त्यामुळे संपादक वार्ताहराला आदराने बोलावतो. तर वार्ताहर संपादकाला एकेरी नावाने बोलावतो. प्राध्यापक काशीकरांची भाषा मोजक्या शब्दात मोठा उपदेश करणारी दिसून येते. तर प्रभूच्या भाषेतून, त्याच्या जिद्दी स्वभावाचे दर्शन घडते. सुदामदादा स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी असल्याने त्यांच्या बोलण्यातून दंडुके, ब्रम्हचर्य सारखे शब्द प्रखर प्रश्नार्थक वाक्ये आलेली दिसतात. तसेच वेश्येच्या भाषेतून तिची बोलण्याची लकब, बोली भाषेचा केलेला वापर लेखकाने योग्य प्रकारे केलेला दिसतो.

वेणूची भाषा विकृत स्वाभावाचे चित्रण करणारी आहे तर जोगीची भाषा त्याच्या निष्पाप वृत्तीचे चित्रण करणारी दिसून येते.

हिंदी – इंग्रजी भाषेचा वापर :–

शोभणेंनी आपल्या कथेला न्याय मिळवून देण्यासाठी भाषा वापरताना कथेची पात्रांची गरज बघून हिंदी–इंग्रजी भाषेचा वापर केलेला आहे. हिंदीतून आलेली संवादाची भाषा ही गरजेनुसार आलेली दिसते.

'वर्तमान' या कथासंग्रहातील 'जल्लोश' या कथेतून हरीश शुक्ला या पात्राचे सर्व संवाद हिंदी भाषेतून शोभणेंनी घेतलेले आहेत. उदा.

'पोलिस स्टेशनसे कब वापस आया ?'

'अभी'

'जमानत किसने दी ?'

'प्रिंसिपलसाबने'

'तो अभी तू स्ट्राइक में को–ऑपरेशन नहीं करेगा ?'

'सॉरी यार, कलम लगते बच गया. अब ये फाल्तू बातों में हम नहीं गिरेंगे. तू भी, यार अब स्ट्राइक पीछे लेले, कुछ रखा नहीं. हमने ये बहुत देखा है. सब फाल्तू का लचांड है और तू स्ट्राइक चलाता होगा, तो चला मेरे साथीदार तेरे साथ कोई नहीं रहेंगे.' ('वर्तमान' पृ.१२९)

वरील संवादातून हरीश शुक्ला हा हिंदी भाषेतून संवाद बोलतो असे दिसते. त्याच्या बरोबर बोलणारी व्यक्ती सुध्दा हिंदीतून बोलताना दिसते. इथे लेखकाने हरीश शुक्ला या पात्राची गरज बघून हिंदी भाषा वापरलेली आहे. शुक्लाची मातृभाषा हिंदी आहे. अशा व्यक्तींना मराठी समजत नाही, बोलताही येत नाही. म्हणूनच लेखकाने या पात्राच्या भाषेची गरज ओळखून हिंदी भाषेचा वापर केलेला दिसून येतो.

शोभणेंनी हिंदी भाषेबरोबर इंग्रजी भाषेचा, शब्दांचा गरजेनुसार वापर केलेला दिसतो. आजकाल लोक इंग्रजी शब्दांचा, वाक्यांचा आपल्या नेहमीच्या भाषेतून वापर करताना दिसून येतात. हे ध्यानात घेवून शोभणेंनी व्यक्तिरेखेला जिवंत बनवण्यासाठी अगदी तशाच भाषेचा वापर केलेला आहे.

'शहामृग' या कथासंग्रहातील 'शहामृग' ह्या कथेतून इंग्रजी भाषेचा वापर केलेला आहे. सुशिक्षित व्यक्ती दैनंदिन जीवनात इंग्रजी भाषेचा वापर करत असतात. ते पुढील संवादातून दिसून येते.

"आईऽ" आपल्या अभ्यासिकेच्या दारातून नीलमनं आवाज दिला.

"तू झोपली नाहीस का गं ?"

"नाही. लिहीत होते. तुमचं बोलणं ऐकून आले. मी तुमचं सगळं बोलणं ऐकलयं."

"हं ऽ"

"सिंपली हिपोक्रिटिक ! आय वॉज नॉट एक्स्पेक्टेड धिस फार्स फ्रॉम यू "

"नीलम, व्हॉट यू मीन ?" आनंदरावांनी विचारलं.

"बाबा, तुम्ही विचार करा, तुम्ही स्वत: ठरवा ... तुम्ही किरणला कुठल्या परिस्थितीतून, कुठल्या वस्तीतून इथं आणलंय. शी वॉज प्रॉस्टिटयूड, आणि तिच्यावर छान कव्हरस्टोरी तयार करून तुम्ही समाजाला दाखवून दिलंय की, अशा मुलीचं आम्ही पुनर्वसन करतोय .." ('शहामृग' पृ.७३)

वरील संवादातून इंग्रजी–मराठी अशा मिश्र भाषेचा वापर लेखकाने केलेला दिसतो. नीलम व आनंदरावांची मातृभाषा मराठी आहे त्यामुळे ते मराठी भाषेचा दैनंदिन जीवनात वापर करतात. पण मधूनच ते इंग्रजी भाषेचाही वापर करताना दिसतात. कारण नीलम हे पात्र एम. एस. सी.त शिकत असलेले दाखवले आहे तर आनंदराव हे पात्र प्रसिध्द समाजसेवकाचे दाखवले आहे. त्यांचा इंग्रजी भाषेशी संपर्क येत असतो. त्यामुळे त्यांना नकळतच दैनंदिन जीवनात इंग्रजी भाषा वापरण्याची सवय झालेली असते. हे ध्यानात घेवून लेखकाने नीलम व आनंदराव यांच्या संवादातून इंग्रजी भाषेचा वापर केलेला दिसतो.

अशा प्रकारे शोभणेंनी हिंदी इंग्रजी भाषेचाही गरजेनुसार वापर केलेला दिसतो. संवादाची भाषा शोभणेंनी पात्रानुसार बदलेली असली तरी योग्य पध्दतीने भाषेचा वापर केलेला दिसतो.

### ग्रामीण बोली भाषेचा वापर :–

शोभणेंनी ग्रामीण बोली भाषेचाही वापर केलेला दिसतो. जेव्हा ग्रामीण पात्रे बोलू लागतात तेव्हा लेखकाने त्यांच्या तोंडी ग्रामीण बोली भाषेत संवाद दिलेले दिसून येतात.

'शहामृग' मधील 'सती आणि महात्मा' या कथेमध्ये भीमा हा अशिक्षित अडाणी आहे व तो गावाकडून आलेला आहे. त्यामुळे त्यांच्या भाषेत बोली भाषेचा लेखकाने वापर केलेला दिसतो.

उदा. ''तुला शिकायची इच्छा आहे ?''

''हौ ऽ''

''कुठला राहणारा आहेस तू ?''

''मुल्लताईकडचा, बोरगावचा, छिंदवाडा जिल्ल्यातला.''

''घरी कोण कोण आहे ?''

''समदेच. माय–बाप, भईण, भाऊ.''

''सगळे अशीच कामं करतात ?''

''तं काय करनार ? घरी दोन एकर वावर हाये, पन तेवड्यामंधी कुठी भागते ? म्हूनकामाच्या तपासात इकडे आला व्हतो. हे काम बंर हाये.'' ('शहामृग' पृ.१६०,१६१)

इथे भीमा हा गावाकडून आलेला एक मजूर आहे. त्याची भाषा ही ग्रामीण बोलीच असणार हे ध्यानात घेवून लेखकाने त्याची संवादाची भाषा लिहिलेली दिसून येते. त्या भीमाची बोलण्याची विशिष्ट लकब दिसून येते. उदा. तं काय असे उत्तर देताना बोलणे. तसेच हाये, व्हतो अशा शब्दांचा वापर करणे.

अशा प्रकारे लेखकाने आपल्या कथेतील पात्रानुरूप भाषेचा वापर केलेला दिसतो. प्रत्येक पात्र आपल्या आचार विचार संस्कृतीनुसार बोलते. तसेच ते सुशिक्षित व अशिक्षित असेल त्याप्रमाणे भाषेचा वापर करत असते. म्हणूनच शोभणेंनी ग्रामीण भागातील, अशिक्षित अशा पात्रांसाठीच ग्रामीण बोली भाषेचा वापर केलेला दिसून येतो.

सारांश, शोभणेंनी आपल्या 'वर्तमान' व 'शहामृग' या दोन्ही कथासंग्रहातून वापरलेली भाषा सहज सुलभ अशीच वाटते. दोन्ही कथासंग्रहातील कथेतून आलेली संवादाची भाषा पात्रानुसार, क्षेत्रानुसार बदललेली दिसते व पात्राच्या बोलण्यातून प्रत्येक पात्राचे वेगळेपण जाणवते. शोभणेंनी पुढारी, स्वातंत्र्यसैनिक, प्राध्यापक, वार्ताहर, वेश्या, विकृती निर्माण झालेली महिला, जोगी अशी पात्रे रंगवलेली आहेत. ही सर्व पात्रे आपापल्या आचार, विचार, संस्कृती, वय, विकार, भावना, विकृतीनुसार बोलताना दिसतात. बाळासाहेब हे पुढारी निर्ढावलेले, मुत्सदी असले तरी वेळप्रसंग बघून

मवाळ भाषेचा वापर करताना दिसतात. संपादक वार्ताहारापेक्षा स्तराने मोठा आहे. पण वयाने लहान आहे. त्यामुळे संपादक वार्ताहराला आदराने बोलावतो. तर वार्ताहर संपादकाला एकेरी नावाने बोलावतो. प्रा. काशीकरांची भाषा मोजक्या शब्दात मोठा उपदेश करणारी दिसून येते. तर प्रभूच्या भाषेतून त्याच्या जिद्दी स्वभावाचे दर्शन घडते. सुदामदादा स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी असल्याने त्यांच्या बोलण्यातून दंडुके, ब्रम्हचर्य सारखे शब्द येतात. प्रखर प्रश्नार्थक वाक्ये आलेली दिसतात. तसेच वेश्येच्या भाषेतून तिची बोलण्याची लकब, बोली भाषेचा केलेला वापर लेखकाने योग्य प्रकारे केलेला दिसतो. वेणूची भाषा विकृत स्वभावाचे चित्रण करणारी आहे. तर जोगीची भाषा त्याच्या निष्पाप वृत्तीचे चित्रण करणारी आहे. त्याचे योग साधनेतील ज्ञान सांगणारी आहे. अशा प्रकारे सर्व पात्रांच्या भाषेत वेगळेपणा जाणवतो.

शोभणेंनी भाषा वापरताना पात्राची कथेतील गरज बघून हिंदी–इंग्रजी भाषेचा वापर केलेला दिसतो. 'जल्लोश' या कथेत हिंदी भाषेचा वापर केलेला आहे. या कथेतील हरीश शुक्लाची मातृभाषा हिंदी आहे. त्यामुळे तो मराठी बोलू शकत नाही. या पात्राची ही गरज ओळखून लेखकाने हिंदी भाषेचा वापर केलेला आहे. तर 'शहामृग' या कथेत इंग्रजी मराठी मिश्र भाषेचा वापर केलेला दिसतो. या कथेतील नीलम व आनंदराव इंग्रजी भाषेच्या संपर्कात असल्यामुळे इंग्रजी भाषेचा वापर करण्याची सवय असते. त्यामुळे लेखकाने संवादासाठी इंग्रजी मराठी मिश्र भाषेचा वापर केलेला दिसतो. तसेच लेखकाने ग्रामीण बोली भाषेचाही वापर गरज बघूनच केलेला दिसतो. अशिक्षित, गावाकडील अशी पात्रे आहेत. त्यांच्यासाठी लेखकाने बोली भाषेचा वापर केलेला दिसतो. लेखकाने भाषा वापरताना अशा सर्व गोष्टींकडे लक्ष दिलेले दिसून येते.

## निवेदनाची भाषा :–

निवेदन करताना निवेदक दोन प्रकारे निवेदन करत असतो. प्रथमपुरूषी व तृतीयपुरूषी निवेदन करत असतो. प्रथमपुरूषी निवेदक हे कथेतील एक पात्र असते. हे पात्र कथेत केंद्रवर्ती असते. किंवा दुय्यम स्वरूपाचे असते. तृतीयपुरूषी निवेदक हे कथेबाहेरील एक निवेदक पात्र असते. निवेदनाच्या या दोन्ही प्रकारांचा विचार केला तर असे दिसून येते की शोभणेंनी तृतीयपुरूषी निवेदन केलेले आहे.

निवेदन करताना शोभणेंनी प्रमाणभाषेचाच वापर केलेला दिसतो व सरळ निवेदन केलेले दिसते. साधी सोपी भाषा निवेदनासाठी वापरलेली दिसते. कथेची सुरूवात करताना प्रत्येक क्षेत्रानुसार निवेदन बदललेले दिसते. त्यामुळे कथानक आकारत जाते. त्याचप्रमाणे पात्राचे जीवन, मन:स्थिती, परिस्थिती हे निवेदनातून शोभणेंनी मांडलेले दिसते.

शोभणेंनी आपल्या 'वर्तमान' व 'शहामृग' या कथासंग्रहातून कथा कोणत्या स्वरूपाची आहे. ते पाहून निवेदन केलेले आहे. राजकीय स्वरूपाचे कथानक असेल तर त्यानुसार निवेदन केलेले आहे. 'वर्तमान' या कथासंग्रहातील 'पायरीचा दगड' ही पूर्ण कथा राजकीय जीवनावर आधारित आहे. तर त्या कथेची सुरवात करताना लेखकाने एका मेळाव्याचे निवेदन करून समाज कार्य करण्यास उत्सुक असलेल्या समाजसेवकांचे व कार्यक्रमांच्या स्थितीचे वर्णन केले आहे.

''अखिल भारतीय शिंपी समाजातर्फे नागपूरच्या गुरूदेव सेवाश्रमात वधू–वर परिचय मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. बाहेरगावांहून येणाऱ्यांना सोयीचं व मध्यभागी पडतं, म्हणून समाजाचे बहुतेक सर्वच कार्यक्रम या ठिकाणीच घेतले जायचे. समोरच्या गेटवर मोठ बॅनर लटकत होतं. समाजबांधवांची ये जा सुरूच होती. समाजाचे कार्यकर्ते कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता मनापासून झटत होते. सगळया कार्यकत्यांनी आपापल्या शर्टवर रिबनचे त्रिकोनाकृती तुकडे अडकवले होते. भविष्याची मोरपंखी स्वप्नं पाहणारी विवाहोत्सुक, उपवर वधू मंडळी सभामंडपात बसलेली होती. ('वर्तमान' पृ.१)

'वर्तमान' मधील 'सत्य' ही कथा वृत्रपत्रीय जीवनाचे चित्रण करते. तर या कथानकाची सुरवात करताना लेखक त्या क्षेत्राप्रमाणेच निवेदन करतो –

''दुपारी बारा वाजता मी माझ्या दैनिकाच्या कचेरीत गेलो. टेबलावर जाण्यापूर्वी टेलिप्रिंटरचा रोल नजरेखालून घातला. फारशा महत्वाच्या बातम्या नाहीत असं पाहून मी शांतपणे माझ्या खुर्चीत बसलो. या आधीचा रोल जगदाळेंनी नजरेखालून घातला होता आणि त्यातल्या एका महत्त्वाच्या बातमीवर ते विशेष वृत्त लिहित होते. ('वर्तमान' पृ.२२)

'वर्तमान' मधील 'जल्लोश' ही कथा कॉलेज निवडणुकीतील भ्रष्टाचार यावर आधारीत आहे. म्हणून लेखक कॉलेजच्या निवडणुकीचे वर्णन करून कथानकाची सुरवात करतात –

"कॉलेजच्या निवडणुका तोंडावर आल्या होत्या. विद्यार्थ्यांमध्ये निवडणुकीचं वारं संचारलं होतं. त्यातच साराभाई कॉलेजची निवडणूक म्हणजे विद्यापीठामध्ये प्रत्येक वर्षी वादाचा विषय ठरणारी ! विद्यापीठात कॉलेजचं नाव जेवढं मोठं, तेवढाच त्या कॉलेजच्या निवडणुकीचाही गवगवा ! खून – मारामाऱ्यांपासून ते कोर्ट–कचेऱ्यांपर्यंत सगळी प्रकरणं या कॉलेजात हटकून व्हायची आणि मग ही प्रकरणं निस्तरण्याकरिता दोन पॅनेल्समधील हेवेदावे – मतभेद मिटविण्याकरिता मुंबईहून मंत्र्यांचे हात लांबायचे. पैशाची गंगा वाहायची. निवडणुकीच्या दिवसांमध्ये आठ–आठ दिवस कॉलेजची पीरिअड बेल पीरिअडस् न होता वांझोट्यागत वाजत असायची. फक्त प्राध्यापकांना कळण्याकरिता. एरव्ही प्रत्येक वर्गात रिकामी बाकडी आणि काळे करकरीत ब्लॅकबोर्ड यापलीकडे काहीही नसायचं." ('वर्तमान' पृ.११३)

अशा प्रकारे लेखकाने 'वर्तमान' या कथासंग्रहातील कथेची सुरवात करताना क्षेत्राचे भान ठेवून निवेदन केले आहे. व केलेले निवेदन परिणामकारकपणे चित्रित झालेले आहे. त्यामध्ये 'पायरीचा दगड'या कथेत राजकीय क्षेत्राचे निवेदन आलेले आहे. लेखकाने मेळाव्याच्या आयोजनाचे, कार्यकर्त्यांच्या हालचालींचे, पोषाखांचे वर्णन करणारी भाषा घेतली आहे. तर 'सत्य' या कथेत वृत्तपत्रकारीतेच्या क्षेत्राचे निवेदन आलेले आहे. लेखकाने इथे भाषेतून टेलिप्रिंटरचा रोल, महत्त्वाच्या बातम्या अशा शब्दांचा जाणिवपूर्वक वापर केलेला दिसतो. तसेच 'जल्लोश' या कथेत शैक्षणिक क्षेत्रातील निवडणुकीचे वर्णन केले आहे. त्यात कॉलेज मध्ये तास न होणे, मारामारी होणे, मंत्र्यांनी त्यात सहभाग घेणे. वगैरे वर्णन साध्या सरळ भाषेतून केलेले आहे. अशा प्रकारे वेगवेगळ्या क्षेत्रानुसार भाषेचा वापर लेखकाने केलेला दिसून येतो. प्रत्येक क्षेत्राशी सलग्न असलेल्या शब्दांचा वापर भाषेतून जाणिवपूर्वक केलेला दिसतो. त्यामुळे राजकीय, वृत्तपत्रकारीता, शैक्षणिक या तीन्ही क्षेत्रातील भाषेतून वेगळेपणा जाणवतो.

शोभणेंनी निवेदनातून व्यक्तिच्या जीवनाचे, मन:स्थितीचे, परिस्थितीचेही चित्रण केले आहे. 'शहामृग' या कथासंग्रहातील 'महाप्रस्थान' या कथेतून सदानंदनंच्या जीवनाचा दैनंदिनक्रम कसा सुरू होतो ते निवेदनातून समजते.

''सदानंदनं सकाळी हातात चहाचा कप घेता घेताच पेपर चाळला. चहा पीत असतानाच पेपर चाळण्याची त्याची नेहमीची सवय तशी ही सवय त्याला फार पूर्वीपासून लागली होती. कॉलेजात शिकत होता तेव्हापासून कपातला चहा पिऊन होईपर्यंत सगळ्या बातम्यांची शीर्षक वाचून व्हायची. त्यातली कुठली बातमी महत्त्वाची आहे, कुठलं फीचर वाचण्याजोगं आहे, हे तो मनाशी ठरवायचा आणि मग रात्री निवांतपणे त्या बातम्या तो वाचून घ्यायचा. त्याच्या या अशा वाचनाची सवय त्याच्या बायकोला गेल्या वीस–बावीस वर्षांपासून झाली होती. त्यामुळे दुपारी ती निवांतपणे पेपर वाचायची आणि त्यातल्या कोणत्या बातम्या महत्त्वाच्या हे तीच त्याला सांगून टाकायची.'' ('शहामृग' पृ.१)

'वर्तमान' या कथासंग्रहातील न सापडलेले उत्तर मधील प्रभा हे पात्र सुरवातीपासूनच नैराश्य स्थितीत दाखवले आहे. प्रभाची मन:स्थिती कशी आहे ते निवेदनातून लेखकाने परिणामकारकपणे चित्रित केले आहे.

''प्रभा छताकडे एकटक नजर लावून बसली होती. कितीतरी वेळ ती छताकडे अशीच पाहत होती. कालच्या थकण्यामुळं कॉटवर बसून तिनं झोपण्याचा प्रयत्न केला. डोळ्यांच्या पापण्या जडावल्यासारख्या भासू लागल्या होत्या. पण कॉटवर तासभर पडून सुध्दा तिला झोप आली नव्हती. एखाद्या सापानं शरीरावयवांना हळूच स्पर्श करून जावं, आणि त्या स्पर्शानं सगळी गात्रंच बधिरल्यागत होऊन जावीत ... असंच काहीसं तिच्या बाबतीत झालं होतं, आणि त्यामुळंच तासभरापूर्वी डोळ्यांवर सावलीसारखी आलेली निद्रा कुठल्या कुठं नाहीशी झाली होती, छताकडे पाहणारे डोळे सताड उघडे होते. कुठं तरी हरवून बसल्याप्रमाणे.'' ('वर्तमान' पृ.३६)

'वर्तमान' या कथासंग्रहातील 'पायरीचा दगड' या कथेतून लेखक सुधीरच्या गरीब परिस्थितीचे निवेदन करण्यामध्ये यशस्वी झालेले आहेत.

''गणेश पेठेतल्या एका बोळात सुधीरचं जुनाट घर होतं. पडायला आलेली मागची भिंत टेकू देऊन कशीतरी हेलपाटत उभी होती. त्याच्याव्यतिरिक्त त्याच्या घरात आई वडील आणि धाकटा भाऊ असे आणखी तीन जीव होते. सुधीरचे वडील शिवणकाम करायचे. इतवारीतून तुकडे आणून त्यांची झबली, टोपडी, चड्डया कमिज शिवून शहरातल्या वेगवेगळया पेठांत बाजाराच्या दिवशी विकायचे. काजबटनांसाठी त्याची आई दिवसभर मांडी घालून बसायची. दोन पिढ्यांपासून दुभत्या म्हशीसारखी

असलेली 'पफ' कंपनीची मशीन त्यांच्या घरी होती. कपडे कापायला एक तुटकासा पाट आणि मशीनवर शिवायला बसण्याकरिता जुन्या जमान्यातली पत्र्याची खुर्ची. कपडे ठेवायला पांजऱ्याच्या पाट्यांचा एक तकलादू संदूक . पिढीजात दारिद्रयाच भांडवल म्हणून जपावं तसा हा संसार. दोन वेळेची बेगमी तेवढी व्हायची. एखादं आजारपण निघालं, तरी कुणापुढं पदर पसरावा लागायचा. एकट्याची मिळकत. अखेर मर्यादा पडणारच.'' ('वर्तमान' पृ.३)

शोभणेंनी 'शहामृग' मधील 'केसाळ कातडी श्वापद' व 'सती आणि महात्मा' या कथेतून व्यक्तिरेखांचेही निवेदनातून चित्रण आले आहे,

'केसाळ कातडीचं श्वापद'या कथेतील जोगीची व्यक्तिरेखा मांडण्याचा लेखकाने यशस्वी प्रयत्न केलेला दिसतो. भगव्या वस्त्रात एक जोगी मांडीवर मृदंग ठेवून, भान हरपून वाजवत होता. डोळेबंद काळया दाढी–मिशा, डोक्याला भगवा पटका बांधलेला. एका हातात तांब्याचं कडं. कपाळावर पांढरा चंदनी टिळा ...''('शहामृग' पृ.८२) याप्रमाणेच 'सती आणि महात्मा' मध्ये आचार्यांची व्यक्तिरेखा आलेली दिसते. ''सुरकुतलेला, तरीही तजेलदार वाटावा, असा चेहरा. पांढऱ्या शुभ्र दाढी–मिशा. चमकणारं टक्कल. अंगावर खादीचे कपडे ...'' ('शहामृग' पृ.१८३) असे निवेदन शोभणेंनी आपल्या कथेतून परिणामकारकपणे केलेले दिसून येते.

सारांश, अशा प्रकारे शोभणेंनी निवेदनाच्या माध्यमातून व्यक्तिच्या जीवनाचे मन:स्थितीचे, परिस्थितीचे व व्यक्तिरेखांचे चित्रण केले आहे. निवेदनाची भाषा साधी सरळ वापरलेली आहे. 'महाप्रस्थान' या कथेत लेखकाने जगण्यातील अनुभवानुसार भाषेचा विनियोग केलेला दिसतो. पेपर वाचणे ही व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाची गरज आहे. म्हणूनच लेखकाने सदानंदच्या पेपर वाचण्याच्या सवयीचे वर्णन भाषेतून केले आहे. तसेच 'न सापडलेले उत्तर' या कथेत प्रभाच्या मन:स्थितीनुसार भाषेचा वापर लेखकाने केलेला आहे. उदा. छताकडे एक टक नजर लावणे, डोळ्यांच्या पापण्या जडावल्यासारखे भासणे, गात्रं बधिरल्यागत होणे, निद्रा कुठल्या कुठे नाहीशी होणे, हरवून बसणे असा भाषेचा वापर लेखकाने केलेला आहे. याच प्रमाणे 'पायरीचा दगड' या कथेत सुधीरच्या गरीब परिस्थितीचे निवेदन लेखकाने केले आहे. हे निवेदन करताना सुधीरच्या दारिद्रयाचे चित्रण करणारी भाषा वापरली आहे. जुनाट घर, पडायला आलेल्या भिंती, वडिलांचा शिवणकामाचा व्यवसाय, कपडे कापयला तुटकासा

पाट, पत्र्याची खुर्ची, तकलादू संदूक असे घराचे घरातील वस्तूंचे वर्णन भाषेतून केलेले आहे. त्याच बरोबर शोभणेंनी व्यक्तिरेखांचेही निवेदनातून चित्रण केलेले आहे. 'केसाळ कातडीचं श्वापद' या कथेत जोगीची व्यक्तिरेखा लेखकाने रंगवलेली आहे. लेखकाने जोगीची वैशिष्टये लक्षात घेवून भाषेचा उपयोग केलेला दिसतो. उदा. भगवी वस्त्र, मृदंग, दाढी–मिशा, भगवा पटका, पांढरा चंदनी टिळा अशी ठळक वैशिष्टये भाषेतून आलेली आहेत. तसेच 'सती आणि महात्मा' या कथेत आचार्यांची व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. इथे आचार्यांच्या वयानुसार भाषेचा वापर लेखकाने केलेला दिसतो. उदा. सुरकुतलेला चेहरा, पांढऱ्या शुभ्र मिशा, टक्कल अशा शब्दांचा वापर करून निवेदन केले आहे.

## निवेदनातून वातावरण निर्मिती :–

आता पर्यंत शोभणेंनी निवेदनातून कथानकाची सुरवात केलेली पाहिली. पात्रांच्या जीवनाचे, मन:स्थितीचे, परिस्थितीचे, आणि व्यक्तिरेखांचे चित्रण केलेले पाहिले. आता शोभणेंनी वातावरण निर्मिती करण्यासाठी निवेदनाचा उपयोग कसा केलेला आहे ते पाहू.

विशिष्ट स्थलकालाच्या चित्रणामुळे कथेत वातावरण निर्मिती होत असते. सुधा जोशीनी आपल्या 'कथा : एक साहित्यप्रकार' यात म्हटले आहे की ''निसर्गपरिसर, वास्तू, रस्ते, इमारतींचे, घरांचे अंतर्भाग यांच्या चित्रणातून साकारणारे वातावरण वास्तवाचा आभास निर्माण करून कथेत प्रत्यक्षतेचा परिणाम साधत असते. दिवसरात्रीचा विशिष्ट प्रहर विशिष्ट ऋतुमान अशा कालाच्या अवकाशाच्या चित्रणातूनही या परिणामाला आकार येत असतो.'' हे वक्तव्य वातावरण निर्मितीला योग्य असेच वाटते. व शोभणेंनी आपल्या दोन्ही कथासंग्रहातून वातावरण निर्मितीसाठी निवेदनातून वरील सर्व घटकांचा समावेश केलेला आहे.

'शहामृग' या कथासंग्रहातील 'सती आणि महात्मा' या कथेतून निसर्गातील बदललेल्या ऋतुमानाचे चित्रण आलेले आहे.

उदा. ''आणि हसत तिनं वर आभाळाकडे पाहिलं. आभाळात एक काळा करडा, मोठा ढग भरून आला होता. काहीसा थंड वाराही सुटला होता. कुठल्याही क्षणी पाऊस येऊ शकत होता. सर्वत्र झोकाळलेलं होतं. (शहामृग पृ. १८९)

"बाहेर पावसानं धरती ओली चिंब झाली होती. तरी पाऊस सुरूच होता. संततधार" (शहामृग पृ. १९१)

या दोन्ही उदाहरणातून लेखकाने ऋतुमानाचे चित्रण केले आहे. पहिल्या उदाहरणातून लेखकाने ऋतुमानाचे चित्रण करण्यासाठी ज्या भाषेचा वापर केला आहे त्यातून वाईट प्रसंग घडणार असल्याचा आभास होतो. त्यासाठी 'काळा करडा मोठा ढग' असा उल्लेख भाषेतून केलेला दिसतो. दुसऱ्या उदाहरणात मात्र लेखकाने ऋतुमानाचे दर्शन घडवण्यासाठी सौंदर्यपूर्ण भाषेचा उपयोग केलेला आहे. कथेत कल्याणी व चंदूच्या मिलनाचा प्रसंग आलेला आहे. या प्रसंगाला अनुरूप वातावरण निर्मिती करण्यासाठी सौंदर्यपूर्ण भाषा लेखकाने लिहिलेली आहे.

उदा. 'खेळिया' या कथेतून रात्रीच्या परिसराचे चित्रण आलेले आहे. उदा –

"रात्र बरीच झाली होती. सर्वत्र निजानीज झाली होती. बंगल्याच्या आवारातील सर्व दिवे मालवून टाकले होते. गेटवरील मर्क्युरी बल्ब तेवढा बाहेर तेवत होता. बंगल्याचा परिसर तसा शांत, स्तब्ध होता. सगळया बेडरूम्स आपापल्या अंगावर फिकट प्रकाश ओढून सुस्तावल्या होत्या." (शहामृग पृ. ११७)

इथे लेखकाने गुढ वातावरण निर्माण होईल अशा भाषेचा उपयोग केलेला दिसतो. बंगल्यातील शांतता वाचकाच्या मनात वाईट भावना आणणारी आहे. भिती निर्माण करणारी आहे त्यासाठी लेखकाने गुढता निर्माण करणारी भाषा वापरली आहे.

'खेळिया' या कथेतून लेखकाने वास्तूचे थोडक्यात निवेदन करून वातावरण निर्मिती केलेली दिसून येते.

"समोर नानासाहेबांची भव्य, देखणी वास्तू उभी होती. वास्तूच्या प्रवेशद्वारावर लिहिलेली 'मातृभूमी 'ही अक्षरं चमकत होती. पटांगणातल्या हौदात कारंजे उडत होते. दोन तीन गाड्या पोर्च मध्ये उभ्या होत्या." (शहामृग पृ. ११४)

लेखकाने राजघराण्यातील वास्तूचे चित्रण करण्यासाठी वातावरण निर्मिती केली आहे. यासाठी भव्यता चित्रित होईल अशा भाषेचा वापर केलेला आहे. प्रवेशद्वारावरील 'मातृभूमी' ही अक्षरं,

हौदातील कारंजे, पोर्च मधील दोन तीन गाड्या अशा भाषेत वास्तूचे बारकावे लेखकाने चित्रित केले आहेत.

सारांश, शोभणेंनी निवेदनातून वातावरण निर्मिती करून कथेला आकार देण्याचा वास्तवता आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. वातावरण निर्मिती करताना निसर्ग, परिसर, वास्तू यांचे चित्रण केलेले आहे. 'सती आणि महात्मा' या कथेत निसर्गातील बदलत्या ऋतुमानाचे चित्रण आले आहे. त्यातून वाईट प्रसंग घडणार असल्याचा आभास होतो. त्यासाठी काळा करडा मोठा ढग असा उल्लेख भाषेतून केलेला दिसतो. त्याचप्रमाणे लेखकाने 'सती आणि महात्मा' या कथेत कल्याणी व चंदूच्या मिलनाचा प्रसंग आलेला आहे. या प्रसंगाला अनुरूप वातावरण निर्मिती करण्यासाठी सौंदर्यपूर्ण भाषा लेखकाने लिहिलेली दिसते. 'खेळिया' या कथेत लेखकाने गुढ वातावरण निर्माण होईल अशा भाषेचा उपयोग केलेला दिसतो. बंगल्यातील शांतता चित्रित करणारी भाषा वाचकाच्या मनात भिती निर्माण करणारी आहे. लेखकाने 'खेळिया' या कथेत राजघराण्यातील वास्तूचे चित्रण करण्यासाठी वातावरण निर्मिती केली आहे. यासाठी वास्तूची भव्यता चित्रित होईल अशा भाषेचा वापर केलेला आहे. प्रवेशद्वारावरील 'मातृभूमी' ही अक्षरं, हौदातील कारंजे पोर्च मधील दोन तीन गाड्या अशा भाषेत वास्तूचे बारकावे लेखकाने चित्रित केले आहेत.

**प्रतिमांचा वापर :-**

शोभणेंनी प्रतिमांचा वापर फारसा केलेला नाही. 'हकनाक' या कथेतून संस्कृतच्या प्राध्यापकाला साजेसे शकार वसंतसेनेचे उल्लेख आलेले आहेत. उदा. "ती मला शकुंतलेच्या सखी सारखी वाटली. साक्षात प्रियंवदा !" (वर्तमान पृ. ५७)

"नवघरेचं नाव घेताच मला वसंतसेनेला छळणाऱ्या राजाच्या शालकाची आठवण झालजी... इथं माझीच वसंतसेना झाली होती ..." (वर्तमान पृ. ६३)

इथे लेखकाने प्रतिमांचा जो वापर केला आहे त्यासाठी संस्कृत प्रचूर भाषेचा वापर केलेला आहे, वाचकाला कळेल अशीच भाषा वापरली आहे. त्यामुळे कोणताही अडथळा वाचताना निर्माण होत नाही.

'खेळिया' या कथेत संवादाच्या माध्यमातून प्रतिमांचा वापर केलेला आहे. उदा.

''अंग वेडाबाई चित्रकार कधी काळा कॅनव्हास काळा करकरीत ठेवील ? काळ्यावर ब्रशचे एकदोन पांढरे हात तर मारीलच. तसंच समज.'' (शहामृग पृ. १३३)

इथे लेखकाने प्रतिमांचा वापर करताना अलंकार प्रचूर भाषेचा वापर केलेला आहे. तर 'महाप्रस्थान' या कथेत प्रतिमांचा वापर करताना रूपकात्मक भाषा वापरली आहे.

उदा. ''झाडाचं खोड जरी एकच असलं तरी त्याच्या फांद्या अनेक असतात. त्या फांद्या दूरदूरच असतात ना. कधी वादळवारं आलं तरच एकमेकींना भिडतात, भेटतात. नाहीतर तसा योगच येत नाही.'' (शहामृग पृ. ८१८)

शोभणेंनी 'इस शहर में हर शख्स' या कथेत संगीतमय भाषेत प्रतिमांचा वापर केलेला आहे.

उदा. 'दीवाना बनाना है तो दीवाना बना दे.

वरना कहीं तकदीर तमाशा ना बना दे ...'' (वतृमान पृ. १०२)

इथे प्रतिमांची भाषा संगीतमय वापरलेली आहे. कारण भाईजी या गायकाच्या घरात ग्रामोफोनवर गझलच्या स्वरूपात या प्रतिमां आलेल्या आहेत. एका गायकाच्या मनाच्या प्रतिमा संगीतातूनच चांगल्या प्रकारे उमटू शकतात हे ध्यानात घेवून संगीतमय भाषेचा उपयोग इथे केलेला दिसतो.

सारांश, लेखकाने प्रतिमांचा फारसा वापर केलेला नसला तरी जेवढा प्रतिमांचा वापर केलेला आहे तेवढा कळणाऱ्या भाषेत केलेला आहे. 'हकनाक' या कथेत प्रतिमांचा वापर करताना संस्कृत प्रचूर भाषेचा वापर केलेला आहे. 'खेळिया' या कथेत अलंकारप्रचूर भाषेतूनप्रतिमा आलेल्या आहेत तर 'महाप्रस्थान' या कथेत प्रतिमांचा जो वापर केला आहे त्याची भाषा रूपकात्मक वापरली आहे. 'इस शहर में हर शख्स...' या कथेत संगीतमय भाषेचा वापर करून प्रतीमांची चित्रण आले आहे.

**वाक्यप्रचार :–** शोभणेंनी वाक्यप्रचारांचा फारसा वापर केलेला नाही. पण जितका त्राक्यप्रचारांचा उपयोग केला आहे तो भाषेला पूरक असाच आहे. त्यांच्या दोन्ही कथासंग्रहातून आलेले वाक्यप्रचार हे दैनंदिन जीवनात वापरले जाणारे असेच आहेत.

उदा – 'तळहाताच्या फोडा प्रमाणे जपणे, वाचा फोडणे, पायावर दगड पाडून घेणे, हातसफाई करणे, कणव वाटणे, मनावर दगड ठेवणे, काळजीने खंगून खंगून जाणे, बहिष्कार टाकणे, तग धरून राहणे, गदारोळ माजवणे, कडाडून हल्ला चढवणे, घाव घालून दोन तुकडे करणे अशा वाक्यप्रचारांचा भाषेतून लेखकाने वापर केलेला दिसतो.

**कामवासनेचे भडक चित्रण :–**

शोभणेंनी आपल्या 'शहामृग' या कथासंग्रहातील प्रत्येक कथेतून कामवासनेचे भडक भाषेत चित्रण केलेले दिसून येते.

उदा. 'सती आणि महात्मा' या कथेत कामवासनेचे भडक चित्रण आलेले आहे - " कसा होता तो अनुभव ? भीती तर स्वारच झाली होती, पण त्याच्या मिठीतून सुटावंसही वाटत नव्हतं. त्याच्या प्रत्येक कृतीला प्रतिसाद द्यावासा वाटत होता. तर आकाशातल्या चंद्राकडे पाहत आपण वाळूमध्ये पडलेलो. त्याचं शरीर आपल्या शरीरावर झुकलेलं. तो तर अधीर झालेल. श्वासांची वाढती लय. एक विचित्र कळ. हवीहवीशी पुरूषाचं इंद्रिय त्या क्षणी इतकं ताठर होतं, हे पहिल्यांदाच कळलं. कपड्यावर पडलेले रक्ताचे डाग दुसऱ्या दिवशी कुणाचंही लक्ष नाही, असं पाहून पाण्यानं धुऊन काढले. . . ." (शहामृग पृ.१६३)

लेखकाने इथे कामवासनेचे जे चित्रण केले आहे. ती कथेची गरज होती असे दिसून येत नाही. तरी भडक भाषेचा वापर करून तो प्रसंग चित्रित केलेला आहे. इथे ज्या भाषेत कामवासनेचे वर्णन आले आहे ते किळसवाने वाटते. त्यामुळे वाचताना वाचकाच्या मनात किळस निर्माण होते. अशी वर्णने ' केसाळ कातडीचे श्वापद ', ' शहामृग ' या कथेतूनही आलेली आहेत.

**समारोप :-**

' वर्तमान ' व ' शहामृग ' या दोन्ही कथासंग्रहातील भाषा आणि निवेदन कसे आले आहे ते पाहिले. त्यात शोभणेंनी वापरलेल्या संवादाच्या भाषेचा, निवेदनाच्या भाषेचा विचार केला तर त्यातील वेगळेपण पुढील प्रमाणे आलेले दिसते.

शोभणेंनी आपल्या ' वर्तमान ' व ' शहामृग ' या दोन्ही कथासंग्रहातील वापरलेली भाषा सहज सुलभ अशीच वाटते. दोन्ही कथासंग्रहातील कथेतून आलेली संवादाची भाषा पात्रानुसार क्षेत्रानुसार बदललेली दिसते व पात्राच्या बोलण्यातून प्रत्येक पात्राचे वेगळेपण जाणवते. शोभणेंनी पुढारी, स्वातंत्र्यसैनिक, प्राध्यापक, वार्ताहर, वेश्या, विकृती निर्माण झालेली महिला, जोगी अशी पात्रे रंगवलेली आहेत. ही सर्व पात्रे आपापल्या आचार विचार संस्कृती, वय, विकार भावना, विकृतीनुसार बोलताना दिसतात. बाळासाहेब हे पुढारी निर्ढावलेले, मुत्सदी असले तरी वेळप्रसंग बघून मवाळ भाषेचा वापर करताना दिसतात. संपादक वार्ताहरापेक्षा स्तराने मोठा आहे. पण वयाने लहान आहे. त्यामुळे संपादक वार्ताहराला आदराने बोलावतो. तर वार्ताहर संपादकाला एकेरी नावाने बोलावतो. प्रा. काशीकरांची भाषा मोजक्या शब्दात मोठा उपदेश करणारी दिसून येते. तर प्रभूच्या भाषेतून त्याच्या जिद्दी स्वभावाचे दर्शन घडते. सुदामदादा स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी असल्याने त्यांच्या बोलण्यातून दंडुके, बह्मचर्य सारखे शब्द येतात. प्रखर प्रश्नार्थक वाक्ये आलेली दिसतात. तसेच वेश्येच्या भाषेतून तिची बोलण्याची लकब, बोली भाषेचा केलेला वापर लेखकाने योग्य प्रकारे केलेला दिसतो. वेणूची भाषा विकृत स्वभावाचे चित्रण करणारी आहे तर जोगीची भाषा त्याच्या निष्पापवृत्तीचे चित्रण करणारी आहे त्याचे योग साधनेतील ज्ञान सांगणारी आहे. अशा प्रकारे सर्व पात्रांच्या भाषेत वेगळेपणा जाणवतो.

शोभणेंनी भाषा वापरताना पात्राची कथेतील गरज बघून हिंदी-इंग्रजी भाषेचा वापर केलेला दिसतो. 'जल्लोश' या कथेत हिंदी भाषेचा वापर केलेला आहे. या कथेतील हरीश शुक्लाची मातृभाषा हिंदी आहे. त्यामुळे तो मराठी बोलू शकत नाही. या पात्राची ही गरज ओळखून लेखकाने संवादासाठी हिंदी भाषेचा वापर केलेला दिसतो. तर 'शहामृग' या कथेत इंग्रजी-मराठी मिश्र भाषेचा वापर केलेला आहे. या कथेतील नीलम व आनंदराव यांचा इंग्रजी भाषेशी संपर्क येत असल्यामुळे इंग्रजी भाषेचा दैनंदिन जीवनात वापर करण्याची सवय असते. त्यामुळे लेखकाने संवादासाठी इंग्रजी-मराठी मिश्र भाषेचा वापर केलेला दिसतो. तसेच लेखकाने ग्रामीण बोली भाषेचाही वापर गरज बघूनच केलेला आहे. अशिक्षित, गावाकडील अशी पात्रे आहेत. त्यांच्यासाठी लेखकाने बोली भाषेचा वापर केलला आहे.

शोभणेंनी आपल्या ' वर्तमान ' व ' शहामृग ' या कथासंग्रहातील कथेतून तृतीयपुरूषी निवेदन केलेले दिसून येते व निवेदनाची प्रमाणभाषेचा उपयोग केलेला दिसतो. शोभणेंनी निवेदन करताना कथानकाची सुरवात क्षेत्रानुसार केलेली दिसते. त्यामध्ये ' पायरीचा दगड ' या कथेत राजकीय क्षेत्राचे निवेदन आले आहे. म्हणून लेखकाने मेळाव्याच्या आयोजनाचे कार्यकर्त्यांच्या हळचालीचे,पोषाखांचे वर्णन करणारी भाषा वापरली आहे. तर ' सत्य ' या कथेत वृत्तपत्रकारीतेचे क्षेत्र निवेदनातून आले आहे. म्हणून इथे लेखकाने भाषेतून टेलिप्रिंटरचा रोल, महत्त्वाच्या बातम्या अशा शब्दांचा जाणिवपूर्णक वापर केलेला दिसतो. तसेच ' जल्लोश ' या कथेत शैक्षणिक क्षेत्रातील निवेदन आलेले आहे. लेखकाने इथे कॉलेजच्या निवडणुकीचे वर्णन केले आहे. त्यात कॉलेज मध्ये तास न होणे, हाणामारी होणे मंत्र्यांनी त्यात सहभाग घेणे वगैरे साध्या सरळ भाषेतून केलेले आहे. अशा प्रकारे वेगवेगळ्या क्षेत्रानुसार भाषेचा वापर लेखकाने केलेला आहे.

शोभणेंनी निवेदनाच्या माध्यमातून व्यक्तींच्या जीवनाचे मन:स्थितीचे, परिस्थितीचे व व्यक्तिरेखांचे चित्रण केले आहे. निवेदनाची भाषा साधी सरळ वापरलेली आहे. 'महाप्रस्थान' या कथेत लेखकाने जगण्यातील अनुभवानुसार भाषेचा विनियोग केलेला आहे. पेपर वाचने ही व्यक्तीच्या जीवनातील महत्त्वाची गरज आहे. म्हणूनच लेखकाने सदानंदाच्या पेपर वाचण्याच्या सवयीचे वर्णन भाषेतून केले आहे. तसेच 'न सापडलेलं उत्तर' या कथेत प्रभाच्या मन:स्थितीनुसार भाषेचा वापर लेखकाने केलेला आहे. उदा. छताकडे एक टक नजर लावणे, डोळ्यांच्या पापण्या जडावल्यासारखे भासणे, गात्र बधिरल्यागत होणे, निद्रा कुठल्या कुठे नाहीशी होणे, हरवून बसणे असा भाषेचा वापर लेखकाने केलेला आहे. याच प्रमाणे 'पायरीचा दगड' या कथेत सुधीरच्या गरीब परिस्थितीचे निवेदन लेखकाने केले आहे. हे निवेदन करताना सुधीरच्या दारिद्रयाचे चित्रण करणारी भाषा वापरली आहे. जुनाट घर, पडायला आलेल्या भिंती वडिलांचा शिवणकामचा व्यवसाय कपडे कापायला तुटकासा पाट, पत्र्याची खुर्ची, तकलादू संदूक असे घराचे, घरातील वस्तूचे दारिद्रय दाखवणारे वर्णन भाषेतून केलेले आहे. त्याच बरोबर शोभणेंनी व्यक्तिरेखांचेही निवेदनातून चित्रण केलेले आहे. 'केसाळ कातडीचे श्वापद' या कथेत जोगीची व्यक्तिरेखा लेखकाने रंगवलेली आहे. लेखकाने जोगीच्या बाह्यअंगाची वैशिष्ट्ये लक्षात घेवून भाषेचा उपयोग केलेला आहे. उदा. भगवी वस्त्र, मृदंग, दाढी-मिशा, भगवा

पटका, पांढरा चांदणी टिळा अशी ठळक वैशिष्ट्ये भाषेतून आलेली आहेत. तसेच 'सती आणि महात्मा' या कथेत आचार्यांची व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. इथे आचार्यांच्या वयाचे वर्णन करणारी भाषा वापरली आहे. उदा. सुरकुतलेला चेहरा, पांढऱ्या शुभ्र मिशा, टक्कल अशा शब्दांचा वापर करून निवेदन केले आहे.

शोभणेंनी निवेदनातून वातावरण निर्मिती करून कथेला आकार देण्याचा, वास्तवता आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. वातावरण निर्मिती करताना निसर्ग, परिसर वास्तू यांचे चित्रण केलेले आहे. 'सती आणि महात्मा' या कथेत निसर्गातील बदलत्या ऋतुमानाचे चित्रण आले आहे त्यातून वाईट प्रसंग घडणार असल्याचा आभास होतो. त्यासाठी 'काळा करडा ढग' उल्लेख भाषेतून केलेला दिसतो. त्याचप्रमाणे लेखकाने प्रसंगाला अनुरूप वातावरण निर्मिती करणारी भाषा वापरली आहे. 'सती आणि महात्मा' या कथेत कल्याणी व चंदूच्या मिलनाचा प्रसंग आलेला आहे. याप्रसंगाला अनुरूप वातावरण निर्मिती करण्यासाठी सौंदर्यपूर्ण भाषा लेखकाने लिहिलेली दिसते. 'खेळिया' या कथेत लेखकाने गुढ वातावरण निर्माण होईल अशा भाषेचा उपयोग केलेला दिसतो. बंगल्यातील शांतता चित्रित करणारी भाषा वाचकाच्या मनात भिती निर्माण करणारी आहे. लेखकाने 'खेळिया' या कथेत राजघराण्यातील वास्तूचे चित्रण करण्यासाठी वातावरण निर्मिती केली आहे. यासाठी वास्तूची भव्यता होईल अशा भाषेचा वापर केलेला आहे. प्रवेशद्वारावरील 'मातृभूमी' ही अक्षरं, हौदातील कारंजे, पोर्च मधील दोन-तीन गाड्या अशा भाषेत वास्तूचे बारकावे, लेखकाने चित्रित केले आहेत.

लेखकाने प्रतिमांचा फारसा वापर केलेला नसला तरी जेवढा प्रतिमांचा वापर केलेला आहो. तेवढा कळणाऱ्या भाषेत केलेला आहे. 'हकनाक' या कथेत प्रतिमांचा वापर करताना संस्कृत प्रचूर भाषेचा वापर केलेला आहे. 'खेळिया' या कथेत अलंकार प्रचूर भाषेतून प्रतिमा आलेल्या आहेत. तर 'महाप्रस्थान' या कथेत प्रतिमांचा जो वापर केला आहे त्याची भाषा रूपकात्मक वापरली आहे. 'इस शहर में हर शख्स' या कथेत संगीतमय भाषेचा वापर करून प्रतिमांचे चित्रण आले आहे.

शोभणे भाषेतून वाक्यप्रचारांचा फारसा वापर केलेला नाही. दैनंदिन जीवनात वापरले जाणारे वाक्यप्रचार आलेले आहेत. त्यामुळे वाचकाला अर्थ समजून घेण्यात अडथळा निर्माण होत नाही.

त्याचबरोबर लेखकाने कामवासनेचेही भडक भाषेतून चित्रण केले आहे. वापरलेली भाषा किळस आणणारी असल्यामुळे वाचकाच्या मनात कामवासनेविषयी तिरस्कार निर्माण होतो

अशा प्रकारे शोभणेंनी भाषा आणि निवेदनातून कथा योग्य प्रकारे साकार करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

## संदर्भ आणि टिपा

१. सुधा जोशी - कथा : एक साहित्यकार, प्रा. वा. ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ, साहित्य अध्यापन आणि प्रकार (संपा.) पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई पृ. २९३